पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती विशेष सभा
कार्यपत्रिका क्रमांक – २३

**सभावृत्तांत**

दिनांक - **२८/०७/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची विशेष सभा मंगळवार दिनांक **२८/०७/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा. जाधव साधना रामदास - सभापती**
२. मा. सौ.पानसरे अमिना महंमद
३. मा. आल्हाट मंदा उत्तम
४. मा. पवार संगीता शाम

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.बहाददरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.मंदा आल्हाट अनुमोदक – मा.अमिना पानसरे

भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल क्लाम यांचे काल दु:खद निधन झालेले असलेने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहून आजची विशेष सभा गुरुवार दि.३०/०७/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य करणेत आली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

**सभापती** - गुरुवार दि.३०/०७/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती विशेष सभा
कार्यपत्रिका क्रमांक – २३
**सभावृत्तांत**
( दिनांक २८/०७/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **३०/०७/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची दिनांक २८/०७/२०१५ ची विशेष तहकूब सभा गुरुवार दिनांक **३०/०७/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा. जाधव साधना रामदास - सभापती**
२. मा. सौ.पानसरे अमिना महंमद
३. मा. काळभोर वैशाली जालिंदर
४. मा. आल्हाट मंदा उत्तम
५. मा. सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा. बो-हाडे शुभांगी संजय
७. मा. भालेकर अरुणा दिलीप
८. मा. पवार संगीता शाम

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पाटील – प्राचार्य मोरवाडी आय.टी.आय., मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.बहाददरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक : २५ विषय क्रमांक : १
दिनांक : ३०/०७/२०१५
सुचक : मा.अमिना पानसरे अनुमोदक : मा.मंदा आल्हाट
संदर्भ :- मा.अमिना पानसरे, मा.मंदा आल्हाट, मा.संगिता पवार, मा.स्वाती साने, व मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात त्यामध्ये महिलांना संगणक प्रशिक्षण देणे ही योजना कार्यरत असून या योजनेत काही सुधारित बदल करणे आवश्यक आहे तरी सोबतच्या प्रपत्र अ नुसार या योजनेत सुधारित बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २६ विषय क्रमांक : २

दिनांक : ३०/०७/२०१५

सुचक : मा.अमिना पानसरे अनुमोदक : मा.मंदा आल्हाट

संदर्भ :- मा.अमिना पानसरे, मा.मंदा आल्हाट, मा.संगिता पवार व मा.स्वाती साने यांचा प्रस्ताव -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या बालवाडयांतील मुलांना खाऊ/पूरक पोषक आहार उपलब्ध करुन देणेकामी मा.महिला बालकल्याण समिती ठराव क्र.३१ दि.१२/९/२०१२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. परंतु देण्यात येणारा आहार बालकांस देणे योग्य असल्याची दैनंदिन तपासणी योग्य त्या यंत्रणेमार्फत करणे आवश्यक आहे. कारण अशा प्रकारच्या योजनेमधुन मुलांना अन्न विष बाधा यासारख्या घटना यापुर्वी अनेक ठिकाणी घडल्या आहेत परंतु मुलांना वाटप करण्यात येणा-या पोषक आहाराची योग्य त्या शासकीय यंत्रणेमार्फत दैनंदिन तपासणी करणे व त्यानंतर आहाराचे वाटप करणे याबाबी क्लिष्ट आहेत त्यामुळे लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सदरची योजना सद्यस्थितीत स्थगीत ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५७३/२०१५
दिनांक : ३०/०७/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

## प्रपत्र – अ

मा.महिला बालकल्याण समिती सभा ठराव क्रमांक २५ दिनांक ३०/०७/२०१५ चे लगत

| सध्याची योजना | प्रस्तावित योजना |
|---|---|
| **योजनेचे नाव –** स्वयंरोजगाराकरिता महिलांना संगणक प्रशिक्षण देणे. | **योजनेचे नाव –** स्वयंरोजगाराकरिता महिलांना संगणक प्रशिक्षण देणे. |
| **योजनेचे स्वरुप –** कोणत्याही जाती धर्माच्या महिला व मुलींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा या करिता शासनाने निश्चित केलेल्या संगणकीय अभ्यासक्रमाचे (MSCIT अथवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले संगणक प्रशिक्षण) प्रशिक्षण देणेत येईल. | **योजनेचे स्वरुप –** महिलांना अद्ययावत संगणक कौशल्य ज्ञात होण्यासाठी एम.एस.सी.आय.टी., डिटीपी, टॅली, वेब डिझायनिंग, मराठी व इंग्रजी टायपिंग, विद्यापीठाकडील मान्यता प्राप्त संगणकीय कोर्सेस / एम.के.सी.एल.मान्यता प्राप्त वेव्ह व KLIC संगणक प्रशिक्षण देण्यात येईल. |
| **लाभाचे स्वरुप –** एम.एस.सी.आय.टी., डिटीपी, टॅली इ. संगणक प्रशिक्षण देण्यात येईल. | **लाभाचे स्वरुप –** एम.एस.सी.आय.टी., डिटीपी, टॅली, वेब डिझायनिंग, मराठी व इंग्रजी टायपिंग, विद्यापीठाकडील मान्यता प्राप्त संगणकीय कोर्सेस / एम.के.सी.एल.मान्यता प्राप्त वेव्ह व KLIC संगणक प्रशिक्षण देण्यात येईल. |
| **प्रमुख अटी व शर्ती** | **प्रमुख अटी व शर्ती** |
| १. लाभार्थीना विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल. | १. लाभार्थीना विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल. |
| २. लाभार्थी किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे | २. प्रशिक्षण देणारी संस्था जी शैक्षणीक अर्हता ठरवेल ती लागू राहिल. |
| ३. लाभार्थीचे पिंपर चिंचवड शहरात वास्तव्य असावे. | ३. लाभार्थीचे पिंपर चिंचवड शहरात वास्तव्य असावे. |
| ४. लाभार्थीला सहभाग शुल्क एकूण फी च्या १० टक्के म.न.पा.कोषागारात भरावे लागेल. | ४. लाभार्थीला सहभाग शुल्क एकूण फी च्या १० टक्के म.न.पा.कोषागारात भरावे लागेल. |
| ५. लाभार्थीस महानगरपालिकेने निश्चित केलेल्या संस्थे मध्ये प्रशिक्षण घ्यावे लागेल. | ५. लाभार्थीस महानगरपालिकेने निश्चित केलेल्या संस्थे मध्ये प्रशिक्षण घ्यावे लागेल. |
| ६. लाभार्थीस अशा प्रकारची मदत देणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहिल. | ६. लाभार्थीस अशा प्रकारची मदत देणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना राहिल. |
| ७. अर्जदार महिलेने अर्जासोबत आधार कार्डची प्रत सादर करणे आवश्यक राहिल. | ७. अर्जदार महिलेने अर्जासोबत आधार कार्डची प्रत सादर करणे आवश्यक राहिल. |

सही/-

**सभापती**

महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.